गोपनीय

**क्रमांक : का.स./बैठक/२४७**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०१६

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी झालेल्या २४७व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

२/२/१६
**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री. द. म. सुकथनकर<br>"प्रिया", वरळी सी फेस,<br>वरळी, मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| श्री. ना. वि. मेराणी<br>ए/४७, आदर्श नगर,<br>वरळी, मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. | - | सदस्य |
| प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
<u>मुंबई - ४०० ००१.</u>

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
<u>मुंबई - ४०० ०३२.</u>

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
<u>मुंबई - ४०० ०२१.</u>

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
<u>मुंबई - ४०० ०३२.</u>

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
<u>मुंबई - ४०० ०३२.</u>

सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
<u>मुंबई - ४०० ०३२.</u>

सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
<u>मुंबई - ४०० ०३२.</u>

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

----------xox----------

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २४७ वी बैठक

दिनांक : १४ जानेवारी, २०१६ (गुरुवार)

वेळ : सकाळी ११.०० वाजता

स्थळ : मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,
सहावा मजला, मंत्रालय
मुंबई - ४०० ०३२.

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. स्वाधीन क्षत्रिय<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. द. म. सुकथनकर | - | सदस्य |
| श्री. ना. वि.मेराणी | - | सदस्य |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |
| श्री. एस.व्ही.आर.श्रीनिवास<br>अति. महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका<br>(महापालिका आयुक्त यांचे प्रतिनिधी) | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. संजय सेठी
अति.महानगर आयुक्त (१)/प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय खंदारे
अति.महानगर आयुक्त (२),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. प्र. द. ममदापुरे
प्रमुख,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी. आर. के. मूर्ती
संचालक (प्रकल्प) मेट्रो व
प्रमुख (अति.कार्यभार),
परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. प्रताप मोहिते
वित्त सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. डी. टी. ठुबे
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप महानगर आयुक्त (प्रशासन) (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय नानावटे
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती व सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या २४६व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करीत असताना कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, गेल्यावेळी त्यांनी अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांना या समितीचे कायम निमंत्रित म्हणून घोषित करावे असे सूचित केले होते. परंतू कार्यवृत्तात याचा उल्लेख आला नाही. महानगर आयुक्त यांनी कार्यवृत्तात तसे बदल करुन घेऊ असे सांगितले. वरील बदलानुसार कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या २४६व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत 'भिवंडी-कल्याण-अदिलाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ वर उल्हास खाडीवर दुर्गाडी किल्याजवळ सहा पदरी पुल बांधणे' या कामाच्या निविदेस मान्यता प्रदान करणेबाबत.**

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत दिनांक २७ जून, २०१४ रोजी प्राधिकरणाच्या १३४व्या बैठकीच्या ठराव क्र.१३०४ अन्वये कार्यकारी समितीने दिनांक २२ फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या २४१व्या बैठकीमध्ये शिफारस केलेल्या रस्त्याच्या व उड्डाणपुलाच्या रु.३६२८.५१ कोटी इतक्या अंदाजित किंमतीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर प्रशासकीय मान्यतेमध्ये रु.८५ कोटी इतक्या किंमतीच्या 'भिवंडी-कल्याण-अदिलाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ वर उल्हास खाडीवर दुर्गाडी किल्याजवळ एकूण ८२०.६० मी. इतक्या लांबीचा सहा पदरी पुल बांधणे' या कामाचा समावेश आहे. सदर कामाची रु.७६.७३ कोटी इतक्या अंदाजित किंमतीची ठोक पद्धतीची (Lumpsum) ई-निविदा प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर तसेच, मराठी दैनिक 'लोकमत' व इंग्रजी दैनिक 'डीएनए' मध्ये दिनांक २९ ऑगस्ट, २०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आली. सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त झालेल्या ३ देकारांपैकी मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांजकडून प्राप्त झालेला लघुत्तम देकार अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा (-) ०.८५% इतक्या कमी दराचा होता.

३.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर निविदा ठोक पद्धतीची (Lumpsum) असल्यामुळे प्रत्यक्ष बांधकामाच्या दरम्यान पायाची खोली, पुलाची लांबी / रुंदी इ. व अन्य बाबींमध्ये

..४/-

निविदेमधील तांत्रिक तरतूदीपेक्षा काही बदल झाल्यास निविदाकाराने मान्य केलेल्या अंतिम आर्थिक ठोक रक्कमेमध्ये वाढ अथवा कमी करण्यासाठी 'Variations' च्या शिर्षकाखाली स्वतंत्र दर मागविण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने खुलासा प्राप्त करणे व आर्थिक देकाराबाबत वाटाघाटी करणे यासाठी प्रथम लघुत्तम निविदाकारास (मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि.) दिनांक २३.०९.२०१५ रोजी निमंत्रित करण्यात आले. या बैठकीमध्ये सदर निविदाकारांकडून पुलाच्या कामामधील 'Variations' मध्ये काही तांत्रिक बाबी आणि त्यांचे दर याबाबत खुलासा घेण्यात आला. तसेच, आर्थिक देकार कमी करण्याबाबत वाटाघाटी करण्यात आल्या त्यास प्रतिसाद देऊन सदर प्रथम लघुत्तम निविदाकाराने त्याचा मूळ प्रस्तावित आर्थिक देकार रु.७६,०७,७७,९५०/- ऐवजी रु.७५,७२,००,०००/- एवढया रक्कमेस अंतिम केला. सदर अंतिम देकार रु.७६.७३ कोटी इतक्या अंदाजित किंमतीपेक्षा (-) १.३१६% इतका कमी आहे. त्यानंतर, अंतिम दराचा सदर आर्थिक देकार "निविदा मूल्यांकन समिती" (Bid Evaluation Committee) पुढे ठेवण्यात आला. सदर समितीची रु.७५,७२,००,०००/- इतक्या अंतिम दराचा आर्थिक देकार स्विकारण्यास शिफारस प्राप्त असून सदर अंतिम आर्थिक देकारास मान्यता प्रदान करणे, तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करणे, असा प्रस्ताव कार्यकारी समितीसमोर सादर केला.

३.३ सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने श्री. ना.वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सदर पुलाच्या बांधकामादरम्यान कामाचा दर्जा तपासण्याकरीता Third Party Quality Control Auditor नेमण्याची व योग्य ती सुरक्षा योजना राबविण्याची सूचना केली.

**निर्णय :** **चर्चेनंतर, बाब टिपणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १२९६ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत 'भिवंडी-कल्याण-अदिलाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ वर उल्हास खाडीवर दुर्गाडी किल्याजवळ सहा पदरी पुल बांधणे' या कामासाठी मे.सुप्रिम

..५/-

इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांच्या वाटाघाटी केलेल्या (Negotiated) आर्थिक देकारास रु.७५,७२,००,०००/- म्हणजेच निविदेमध्ये नमूद केलेल्या रु.७६.७३ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा (-) १.३१६% कमी इतक्या रक्कमेच्या अंतिम आर्थिक देकारास तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत 'प्रस्तावित माणकोली मोटागांव रस्त्यावर उल्हास खाडीवर सहा पदरी पुल बांधणे' या कामाच्या लघुत्तम निविदेस मान्यता प्रदान करणेबाबत.**

४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत दिनांक २७ जून, २०१४ रोजी प्राधिकरणाच्या १३४व्या बैठकीच्या ठराव क्र.१३०४ अन्वये कार्यकारी समितीने दिनांक २२ फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या २४१व्या बैठकीमध्ये शिफारस केलेल्या रस्त्याच्या व उड्डाणपुलाच्या रु.३६२८.५१ कोटी इतक्या अंदाजित किंमतीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. सदर प्रशासकीय मान्यतेमध्ये रु.२४५ कोटी इतक्या किंमतीच्या 'माणकोली मोटागांव रस्त्यावर उल्हास खाडीवर_सहा पदरी पुल बांधणे' या कामाचा समावेश आहे. सदर पुलाची लांबी १२२५ मी. (पोचमार्ग धरुन) व रुंदी २७.५ मी. इतकी आहे. सदर कामाची प्रथम ई-निविदा दिनांक २२.८.२०१४ रोजी रु.१९०.०० कोटी इतक्या अंदाजित किंमतीच्या विषयांकित कामाकरीता ठोक पद्धतीची (Lumpsum) ई-निविदा प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर तसेच, मराठी दैनिक 'लोकमत' व इंग्रजी दैनिक 'हिंदुस्थान टाइम्स' मध्ये प्रसिध्द करण्यात आली. सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त झालेल्या ४ देकारांपैकी मे. जे.कुमार इन्फ्रास्ट्रक्चर लि. - मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर लि. (एकत्रित उपक्रम) यांजकडून प्राप्त झालेला लघुत्तम देकार अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा (+) १९.५१% इतक्या कमी दराचा होता.

४.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर कामाची निविदा एकरक्कमी पद्धतीची (Lumpsum) आहे व लघुत्तम निविदाकाराने निविदेमध्ये दिलेली किंमत ही कंत्राटाच्या किंमतीपेक्षा १९.५१% ने अधिक असल्याने लघुत्तम निविदाकाराकडे खुलासा मागविण्यात आला होता. लघुत्तम निविदाकाराने याबाबत खालीलप्रमाणे खुलासा दिला :

अ) ज्या ठिकाणी नदीवर पुल बांधावयाचे आहे, सद्य:स्थितीत नदीच्या दोन्ही काठावर ये-जा करणेसाठी रस्ता अस्तित्वात नाही व त्यामुळे रस्ता बनविणेसाठी अतिरिक्त खर्च होणार आहे.

ब) पुलाच्या एका काठावरुन दुस-या काठावर जाणेसाठी लागणा-या रस्त्याची अंदाजे लांबी २५ ते ३० कि.मी. इतकी आहे. तसेच दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करण्यासाठी दोन्ही काठावरुन एकत्रित काम सुरु करावे लागणार आहे. त्यामुळे दोन्ही काठावर यंत्रसामुग्री, कार्यालय इ. गोष्टींची वेगवेगळी स्थापना करावी लागणार आहे.

क) तसेच नदीवर ज्या ठिकाणी पुल बांधावयाचा आहे, त्या ठिकाणी पाण्याची खोली लाटा व भरती-ओहोटीच्या प्रमाणाच्या प्रभावामुळे मूळ कामाच्या अतिरिक्त खर्चामध्ये वाढ होणार आहे.

४.३ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, निविदाकाराने नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने प्रमुख, अभियांत्रिकी विभाग यांनी दिनांक १५.१०.२०१५ रोजी बैठक आयोजित केली व सल्लागार मे.मोनार्च यांना वरील बाबींच्या अनुषंगाने त्यांचे मत लेखी देण्यास सांगितले. सल्लागार मे.मोनार्च यांनी दिनांक १९.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे खुलासा केला :-

अ) निविदेमध्ये नमूद केलेली अंदाजपत्रकीय रक्कम ही ठाणे, डी.एस.आर. २०१३-१४ प्रमाणे आहे व कंत्राटाच्या बाजारभाववाढीमधील अटीनुसार ७.२७% इतक्या अधिक रक्कमेचा खुलासा होत आहे.

ब) तसेच ई-निविदा पध्दतीने निविदा मागविणे, निविदा भरणारे आंतरराष्ट्रीय दर्जाचे कंत्राटदार तसेच निविदा बोलविण्यापासून कंत्राट देईपर्यंतचा कालावधी या बाबीसुध्दा लक्षात घेणे आवश्यक आहे.

क) कंत्राटदाराने नमूद केलेल्या अतिरिक्त खर्चाच्या बाबी वरकड खर्चाशी निगडीत आहेत. रस्ते व राजमार्ग मंत्रालयाने (MORTH) नमूद केलेल्या माहिती पुस्तिकेत अशाप्रकारच्या पुलांना २५% इतका वरकड खर्च घेण्याबाबत नमूद केले आहे व डी.एस.आर. मध्ये फक्त १०% इतका वरकड खर्च (नफा धरुन) विचारात घेतला जातो.

वरील सर्व बाबी लक्षात घेता २५% ऐवजी १०% इतका अतिरिक्त वरकड खर्च व ७.२७% इतकी बाजारभाव वाढ असे दोन्ही मिळून १७.२७% इतकी कंत्राटाच्या रक्कमेपेक्षा अधिक किंमत देण्यास योग्य ठरेल असे मत मे.मोनार्च सल्लागार यांनी दिले.

४.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, लघुत्तम निविदाकाराने वरील सर्व बाबी मान्य करुन १७.५०% इतकी रक्कम कंत्राटाच्या रक्कमेपेक्षा अधिक ठरवून दिल्यास काम करण्याची तयारी दर्शविली. सल्लागार यांनी शिफारस केलेली अतिरिक्त रक्कम १७.२७% व लघुत्तम निविदाकाराने वाटाघाटामध्ये मान्य केलली अतिरिक्त रक्कम १७.५०% या दोन्हींमध्ये फारशी तफावत नसल्याने १७.५०% इतक्या अधिक रक्कमेसह लघुत्तम निविदाकाराच्या निविदेस मान्यता देण्याचा प्रस्ताव निविदा समितीसमोर दिनांक २१.१०.२०१५ रोजी सादर करण्यात आला. निविदा समितीने सदर प्रस्तावास मान्यता देतेवेळी लघुत्तम निविदाकार हा चारही निविदाकारांनी 'Variations' च्या शिर्षकाखाली दिलेल्या दरांमध्ये कमीत कमी असलेल्या दरास काम करण्यास मान्य असल्याबाबतचे सहमती पत्र घेण्यास सांगितले. त्यानुसार लघुत्तम निविदाकाराने त्यांचे पत्र दिनांक २३.१०.२०१५ अन्वये 'Variations' च्या शिर्षकाखाली काम करण्याचे मान्य केले.

४.५ श्री. ना.वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सदर पुलाच्या बांधकामादरम्यान Third Party Quality Control Auditor नेमण्याची सूचना केली.

४.६ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी लघुत्तम निविदाकाराची निविदा अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा १७.५०% इतके अधिक असल्याने अंदाजपत्रक बनविणा-या सल्लागारांकडून याबाबत लेखी खुलासा मागविण्यात यावा व पुढील कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये सदर खुलासा सादर करण्याविषयी सांगितले.

..८/-

४.७ श्री. ना.वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी भविष्यातील अशा प्रकारच्या कामाच्या निविदांमध्ये खालील गोष्टी अंतर्भूत करण्यात याव्यात अशी सूचना केली :-

अ) बोली क्षमतेच्या (Bid Capacity) अटींविषयी बाब निविदेमध्ये समाविष्ट करावी तसेच त्याबाबत बाब टिप्पणीमध्ये नमूद करण्याविषयी सुचविले.

ब) सुरक्षा योजनेअंतर्गत येणाऱ्या बाबी उदा.सी.सी.टी.व्ही. कॅमेरे, पेट्रोलिंग इ. साठी अंदाजपत्रकामध्ये पुरेशी तरतूद करण्यात यावी.

४.८ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती व श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी खालील प्रमाणे सूचना केली :

अ) सल्लागाराच्या निविदा एकरक्कमी पध्दतीने मागविण्यात याव्या.

ब) अशा प्रकारच्या कामांसाठी बाजार भाववाढ न देण्याच्या अटीवर दोन वर्षे कंत्राट कालावधी गृहित धरुन नमुना निविदा काढण्यात यावी.

मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी प्रायोगिक तत्वावर वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याविषयी सांगितले.

**निर्णय :** **चर्चेनंतर, बाब टिपणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजुर केला :-**

**ठराव क्र. १२९७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत 'प्रस्तावित माणकोली मोटागांव रस्त्यावर उल्हास खाडीवर सहा पदरी पुल बांधणे' या कामासाठी मे.जे. कुमार इन्फ्रास्ट्रक्चर लि. - मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर लि. (एकत्रित उपक्रम) यांच्या वाटाघाटी केलेल्या (Negotiated) आर्थिक देकार रु.२२३.२५ कोटीस मान्यता देत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : वडाळा भारवाहक तळासाठी घाटकोपर-वडाळा-नायगाव या प्रस्तावित जलवाहिनी बोगद्याच्या बांधकामाचा प्रमाणित वाटा (Proportionate Cost) खर्चाची बृहन्मुंबई महानगरपालिकेस पुर्तता करणेबाबत.**

५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, नवीन नियोजनाच्या अनुषंगाने वडाळा भारवाहक तळासाठी लागणा-या पाणीपुरवठयामध्ये वाढ होणे अपेक्षित आहे. त्यानुसार प्राधिकरणातर्फे प्रावधान करण्याची विनंती बृहन्मुंबई महानगरपालिकेस करण्यात आली होती. सदर विनंतीस अनुसरुन बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे वडाळा भारवाहक तळासाठी अंदाजे लागणारा पाणीपुरवठा निश्चित करण्यात आला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे मुंबई बेटासाठी भविष्यात येणा-या वाढीव पाणीपुरवठयाच्या मागणीची पूर्तता करण्याच्या दृष्टीकोनातून घाटकोपर-वडाळा-नायगाव अशा २५०० मि .मी. व्यासाच्या पाणीपुरवठा बोगद्याच्या कामाचे नियोजन करण्यात आले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे प्राधिकरणास दिनांक २०.१०.२०१५ रोजीच्या पत्रानुसार दोन पर्याय सुचविण्यात आले आहेत. सदर पर्याय खालीलप्रमाणे आहेत :-

(अ) प्राधिकरणास नविन नियोजनानुसार वडाळा भारवाहक तळासाठी लागणा-या अतिरिक्त पाणीपुरवठयाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने १५०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी घाटकोपर पासून वडाळयापर्यंत (५.३० कि.मी. लांबीची) टाकावी लागेल व त्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खर्चाच्या अंदाजानुसार रु.७८.३१ कोटी अधिक सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे आकारण्यात येणा-या लेव्ही खर्चाची पूर्तता करावी लागेल.

(ब) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे प्रस्तावित घाटकोपर-वडाळा-नायगाव या पाणीपुरवठा बोगद्यासाठी येणा-या खर्चाचा प्रमाणित वाटयाची (Proportionate Cost) पूर्तता प्राधिकरणातर्फे करण्यात यावी. हा प्रमाणित वाटा रु.७० कोटी इतका असेल. बृहन्मुंबई महानगरपालिकेने वरील दोन्ही पर्यायांत दर्शविलेला खर्च हा सन २०१६ प्रमाणे असून त्यात दोन्ही पर्यायांस प्रतिवर्षी ८ % दरवाढ सूचित केलेली आहे.

५.२ वरील पर्यायांची अवलोकन करता महानगर आयुक्त यांनी पर्याय क्र. (ब) म्हणजे घाटकोपर-वडाळा-नायगाव या पाणीपुरवठा बोगद्यासाठी येणा-या खर्चाच्या प्रमाणित वाटयाची पूर्तता करण्याचा पर्याय संयुक्तिक दिसून येत असल्याबाबत सांगितले.

५.३ चर्चेदरम्यान श्री. ना.वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सूचित केले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे उल्लेखित बोगद्याच्या बांधकाम खर्चाची प्रमाणित वाटयाची पूर्तता प्रत्यक्ष बांधकाम खर्चाच्या प्रमाणात प्राधिकरणातर्फे करण्यात यावी.

**निर्णय :** **चर्चेनंतर, बाब टिपणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजुर केला :-**

**ठराव क्र. १२९८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे घाटकोपर-वडाळा-नायगाव या बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे प्रस्तावित असलेल्या पाणीपुरवठा बोगद्यासाठी येणा-या खर्चापैकी प्रमाणित वाटा (Proportionate Cost) जो की, सन २०१६ साठीचा खर्च रु.७० कोटी इतका तसेच प्रतीवर्षी ८% दरवाढीप्रमाणे येणारा खर्च वडाळा भारवाहक तळ येथील नवीन नियोजनानुसार लागणा-या वाढीव पाणीपुरवठयाची पुर्तता करण्याच्या दृष्टीने प्राधिकरणातर्फे देण्यास मान्यता देण्यात येत आहे. परंतू सदर खर्चाची पूर्तता ही बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे बोगद्यासाठी येणा-या प्रत्यक्ष बांधकाम खर्चाच्या प्रमाणात वाटा प्राधिकरणातर्फे बृहन्मुंबई महानगरपालिकेस अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ :** **मेट्रो मार्ग-७ अ : अंधेरी (पूर्व) - दहिसर (पूर्व) या मेट्रो मार्गाकरिता अंतरिम सल्लागार दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या कामाच्या सुधारीत व्याप्ती आणि किंमतीस मान्यता देण्याबाबत.**

६.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २४६व्या बैठकीमध्ये मेट्रो मार्ग - ७ अ : अंधेरी (पूर्व) - दहिसर (पूर्व) या प्रकल्पाकरीता दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना एकमेव स्त्रोत तत्वावर अंतरिम सल्लागार म्हणून

प्रकल्पाच्या स्थापत्य कामासाठी मागविण्यात येणा-या निविदा किंमतीच्या रु.१४०९.२ कोटीच्या ०.२५% म्हणजेच रु.३.५२ कोटी + सेवा कर इतक्या किंमतीवर नेमणूक करण्यात आली आणि सदर बाब टिप्पणीमध्ये दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. आणि प्राधिकरण यांच्या जबाबदा-या उल्लेखित केल्या होत्या याबाबत अवगत केले.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ आणि ३ डिसेंबर, २०१५ रोजी प्राधिकरण आणि दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांच्या वरिष्ठ अधिका-यांसमवेत झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार सर्वसाधारण सल्लागाराच्या नियुक्तीकरीता ६ महिने ते १ वर्षाचा कालावधी लागू शकतो आणि प्रकल्पाच्या अंतरिम सल्लागाराच्या व्याप्तीमध्ये फक्त स्थापत्य कामाचा समावेश नसून स्थानके व कारडेपोची संरचना, सिग्नलिंग व दळणवळण आणि इतर व्यवस्था यांचे सुध्दा नियोजन करावे लागणार आहे. त्यामुळे अंतरिम सल्लागाराची फी ठरविण्याकरीता प्रकल्पाची किंमत रु.१४०९.२ कोटी ऐवजी प्रकल्प पूर्णत्वाची किंमत रु.५२७१ कोटी (जमिनीची किंमत रु.६०६ कोटी आणि संबंधित कर वगळून) इतकी घेण्यात यावी, अशी दिल्ली मेट्रो रेल महामंडळाने मागणी केली. या विषयावर व्यवस्थापकीय संचालक, दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांच्यासमवेत चर्चा झाल्यानंतर सल्लागाराची फी प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या ०.२५% ऐवजी ०.१२५% पर्यंत कमी करण्याचे मान्य केले.

त्यास अनुसरुन सल्लागाराची व्याप्ती आणि देयकावर सखोल चर्चा झाल्यानंतर सल्लागाराच्या कामाच्या व्याप्तीमध्ये काही बदल करुन मेट्रो मार्ग - ७ अंधेरी (पूर्व) - दहिसर (पूर्व) या प्रकल्पाकरीता दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना एकमेव स्त्रोत तत्वावर अंतरिम सल्लागार म्हणून प्रकल्पाच्या कामासाठी रु.३.५२० कोटी + सेवा कराऐवजी रु.६.५८९ कोटी + सेवा कर इतक्या किंमतीस मंजूरी देण्याचे प्रस्तावित आहे.

६.३ तदूनंतर, मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. ही पूर्णतः शासकीय संस्था आहे का अशी विचारणा केली असता त्यावर महानगर आयुक्त यांनी दिल्ली मेट्रो रेल महामंडळ लि. ही संस्था दिल्ली सरकार आणि भारत सरकार यांचा संयुक्त उपक्रम आहे असे सांगितले.

६.४ श्री. ना.वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सुचविले की, प्रकल्पाच्या सुरक्षितेबाबत मुंबई पोलिस, सार्वजनिक बांधकाम व बृहन्मुंबई महानगरपालिका या संबधित विभागांशी समन्वय साधून प्रकल्पाच्या अंदाजित किंमतीत आवश्यक ती तरतूद करावी.

**निर्णय :** **चर्चेनंतर, बाब टिपणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजुर केला :-**

**ठराव क्र. १२९९ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समितीच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या २४६व्या बैठकीत दिलेली मंजूरी ठराव क्र.१२९१ यात अंशत: बदल करुन कार्यकारी समितीने याव्दारे मेट्रो मार्ग - ७ अंधेरी (पूर्व) - दहीसर (पूर्व) या प्रकल्पाकरीता दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना एकमेव स्त्रोत तत्वावर अंतरिम सल्लागार म्हणून प्रकल्पाच्या कामासाठी रु.३.५२० कोटी + सेवा कर ऐवजी रु.६.५८९ कोटी + सेवा कर इतक्या किंमतीस मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ :** **विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत नालासोपारा-निर्मल रस्ता प्रजिमा ३९ या रस्त्याचे रुंदीकरण व मजबूतीकरण करणे या कामाच्या सुधारीत वाढीव रक्कमेस मंजूरी मिळणेबाबत.**

७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत, नालासोपारा निर्मल रस्त्याचे २ + २ मार्गिकांमध्ये रूंदीकरण व मजबुतीकरण करणे या कामास दिनांक ०८.०९.२०११ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १२९ व्या बैठकीत ठराव क्रमांक १२६४ अन्वये रू.४६.३० कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यानंतर सदर कामाचे मे.मोनार्च सर्व्हेअर्स ॲड इंजिनिअरींग कन्स्ल्टंट प्रा.लि. मुंबई यांचेकडून अंदाजपत्रक तयार करून घेऊन कामाच्या मोहोरबंद निविदा मागविण्यात आल्या. त्यापैकी मे.रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस् लि. यांची अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा ११.०७% लघुत्तम दराच्या रू. ३७.२२ कोटी रक्कमेस दिनांक १०.०७.२०१२ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २३४ व्या बैठकीत ठराव क्रमांक १२०६ अवये मान्यता देण्यात आली.

७.२ महानगर आयुक्त यांनी सदर कामाच्या निविदेमधील किंमतीमध्ये काम करतेवेळी उद्भवलेल्या अतिरिक्त बाबी, कामाच्या व्याप्तीमधील बदल व पावसाळयातील रस्त्याची दुरूस्ती इ. मुळे झालेली एकुण वाढ रू. १०.७९ कोटी, वेगवेगळया सेवा वाहिन्या स्थलांतर करतेवेळी झालेली वाढ रू. ६.११५ कोटी, कंत्राटदारास भाववाढीपोटी देय असलेली वाढ रू.३.४३ कोटी व प्रकल्प सल्लागाराच्या फी मध्ये झालेली वाढ रू.०.३५ कोटी अशी एकूण रू. १८.६०५ कोटी वाढीबाबत कार्यकारी समितीस खालीलप्रमाणे अवगत केले :-

१. खोदकामातून उपलब्ध झालेल्या मातीचा रस्त्याच्या कामासाठी पुर्नवापर करण्याचे गृहीत धरले होते. परंतू सदर काम करताना रस्त्याच्या रूंदीमध्ये वसई विरार शहर महानगरपालिकेच्या व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईन या रस्ता रूंदीकरणाच्या जमिनीखाली असल्याने रस्त्याचा तलांक स्थिर करण्यासाठी सदरच्या रस्त्याचे अंदाजपत्रकातील तरतुदी एवढे खोदकाम या पाईपलाईनमुळे शक्य झाले नाही. त्यामुळे पुर्नवापरासाठी खोदकामातून निघालेला मुरूम उपलब्ध होऊ शकला नाही. तसेच रस्त्याचे काही भागामध्ये वन जमिनीमध्ये खोदकाम न करता आल्यामुळे मुरूम उपलब्ध होऊ शकला नाही. त्यामुळे रस्त्याचे भरावासाठी मुरूम बाहेरून आणावा लागला. त्यामुळे मुरूमासाठी रु. १.६० कोटी एवढा वाढीव खर्च झालेला आहे .

२. सा.क्र. ५/२०५ ते ५/७१५ (पेट्रोल पंप ते टोलनाका ) या भागामध्ये रस्त्याचा उतार कमी करण्यासाठी मोठया प्रमाणात खोदकाम प्रस्तावित केलेले होते. परंतु सदरचा हा भाग वन विभागाच्या जमीनीतून जात असल्यामुळे व वन विभागाची परवानगी नसल्याकारणाने खोदकाम करता आले नाही. कंत्राटदारास कामाचे कार्यारंभ आदेश दिल्यामुळे व काम विहित मुदतीत पूर्ण करण्याचे असल्याने वन विभागाच्या परवानगीसाठी थांबणे शक्य नव्हते. त्यामुळे भरावासाठी मुरूम, दगड इ. उपलब्ध होऊ शकले नाही. साखळी क्र. ५/२०० ते ५/७३० या भागामध्ये वन विभाग असल्यामुळे तेथे खोदकाम करता आलेले नाही. त्यामुळे या लांबीतील खोदकामामध्ये रू. ३.१२ कोटी इतकी बचत झालेली आहे.

३. मुळ अंदाजपत्रकामध्ये फक्त ३५१० मीटर मध्येच रस्त्याच्या दुतर्फा गटार बांधण्याचे प्रस्तावित केलेले आहे. व उर्वरीत लांबीमध्ये अंदाजपत्रक तयार करताना रस्त्याच्या दुतर्फा मोकळी जागा असल्याकारणाने पक्क्या गटारांची तरतूद करण्यात आली नव्हती. परंतु येथील नागरीकरण अत्यंत वेगाने झाले असुन रस्त्याच्या दुतर्फा दुकाने व व्यापारी गाळे बांधले गेले आहेत. त्यामुळे

त्या लांबीमध्ये पाण्याचा निचरा होण्यासाठी व रस्त्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पक्की गटारे बांधणे आवश्यक होते. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विनंती नुसार या भागामध्ये संपूर्ण लांबीमध्ये बंदिस्त गटारे बांधण्यात आली. सदर जादा लांबीची गटारे बांधण्यासाठी निविदा बाब अंतर्गत रू. ५.१६ कोटी इतका जादा खर्च झालेला आहे.

४. मुळ अंदाजपत्रकामध्ये बंदीस्त गटाराच्या स्लॅबवर पादचाऱ्यांना चालण्यासाठी पेव्हर ब्लॉकची व नियमित गटारातील गाळ काढण्यासाठी व देखभाल दुरूस्तीसाठी चेंबरची तरतूद केली नव्हती. परंतु सदरचे काम अत्यावश्यक असल्यामुळे फुटपाथच्या स्लॅबवर पेव्हर ब्लॉक्स बसविणे व नियमित देखभाल दुरूस्तीसाठी चेंबर (Chambers) बांधण्यात आले. सबब, या अतिरिक्त बाबी अंतर्गत एकूण रू. २.०५ कोटी इतका जादा खर्च झालेला आहे.

५. सदर रस्ता रूंदीकरणाचे काम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करताना कोणत्याही प्रकारची दुरूस्ती करण्यात आलेली नव्हती. तसेच सदर रस्ता पावसाळयात हस्तांतरीत करण्यात आला. पावसामुळे रस्त्याची अत्यंत दयनिय अवस्था झालेली होती. रस्त्यावर कुठेही अपघात होऊ नये व वाहतुक कोंडी होऊ नये यासाठी युद्ध पातळीवर दुरूस्ती करण्यात आली. सन २०१२ व सन २०१३ चा पावसाळा या दोन्ही वर्षामध्ये अस्तित्वातील पूर्वीच्या रस्त्याची दुरूस्ती कामासाठी निविदेतील बाबींअंतर्गत रू. २.२७ कोटी इतका जादा खर्च झालेला आहे.

६. सा.क्र. ५/७३० (टोलनाका) ते सा.क्र.६/६३० (रेल्वे उड्डाणपुल) याभागामध्ये पूर्वी सिडकोने पाईपची / काँक्रीटची गटारे बांधलेली होती. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये या भागातील गटारे बांधण्याचा अंतर्भाव करण्यात आलेला नव्हता. परंतु देखभाल दुरूस्ती अभावी व बऱ्याच ठिकाणी पाईपची गटारे बांधण्यात आलेली असल्यामुळे, गटारे गाळाने तुंबलेली होती. यामुळे या भागामध्ये पावसाळयात पाण्याचा निचरा न झाल्यामुळे पाणी तुंबुन रस्ता खराब होणे व वाहतुकीची कोंडी होणे या बाबी वारंवार घडत असत. वसई विरार शहर महानगरपालिकेने विनंती केल्यानुसार व तेथील भौगोलीक परिस्थितीनुसार त्या ठिकाणी जुनी गटारे तोडून मोठी गटारे बांधण्यात आली आहेत. या कामासाठी निविदेतील बाबींअंतर्गत रू.२.८२ कोटी इतका जादा खर्च झालेला आहे.

..१५/-

७. नालासोपारा पश्चिम सा.क्र. ७/२३० (रेल्वे उड्डाणपुल) ते सा.क्र. ८/४६० (समेळ नाला) याभागामध्ये मंजूर निविदेप्रमाणे १.१० मी रूंदीची गटारे बांधण्याचे प्रस्तावित आहे. परंतु तेथील भौगोलीक परिस्थितीमुळे पावसाळयामध्ये पाण्याचा विसर्ग मोठया प्रमाणात होऊन पाणी रस्त्यावर तुंबत होते व पूर्वीची गटारे पाणी विसर्ग वहन क्षमतेस अपूर्ण पडत होती. तेथील प्रत्यक्ष परिस्थितीनुसार व वसई विरार शहर महानगरपालिकेने विनंती केल्यामुळे या लांबीमध्ये १.१० मी. ऐवजी १.५० मी. रूंदीची मोठया आकाराची गटारे बांधण्यात आली. या कामासाठी निविदेतील बाबीअंतर्गत अतिरिक्त बाबींसाठी रू. ०.३० कोटी इतका जादा खर्च झालेला आहे.

८. सा.क्र. ४/६२० (संतोषभुवन) ते सा.क्र. ६/६३० (रेल्वे उड्डाणपुल) व सा.क्र. ८/९०० ते सा.क्र. ९/१०० या भागामध्ये पावसाळयामध्ये वारंवार पाणी तुंबुन डांबरी रस्ता खराब होत असे. त्यामुळे या भागात वसई विरार शहर महानगरपालिकेने विनंती केल्यानुसार मंजूर निविदेतील डांबराऐवजी पेव्हर ब्लॉकचा रस्ता तयार करण्यात आलेला आहे. या कामासाठी निविदेंतर्गत रू.३.८२ कोटी इतका अतिरिक्त खर्च झालेला आहे. या ठिकाणी डांबरीकरण न केल्यामुळे व संपूर्ण रस्त्याच्या लांबीमध्ये डी.बी.एम. १०० मी.मी. ऐवजी ७५ मी.मी. केल्यामुळे रू. ३.९६ कोटी इतकी बचत झालेली आहे.

९. रस्ता रूंदीकरणासाठी काही ठिकाणी खाजगी बंगल्यांच्या संरक्षण भिंती तोडणे आवश्यक होते. तसेच वन विभागाच्या जागेमध्ये डोंगराळ भाग असल्यामुळे व ज्यादा रूंदीकरणास वाव नसल्यामुळे तेथे नव्याने संरक्षण भिंतीचे काम केलेले आहे. रहदारी नियमन व्यवस्थित व सुरक्षित होण्यासाठी लेन मार्गीका करणे, कर्ब स्टोनला (Kerb Stone) पेंटींग करणे, आवश्यकतेनुसार ५ नवीन सिडी वर्कस (Pipe Culverts) बांधणे इ. कामासाठी रू. ०.७५ कोटी इतका अतिरिक्त खर्च झालेला आहे.

या सर्व वाढीमुळे कामाची सुधारित निविदा रक्कम रू.४८.०१ कोटी इतकी झाली असल्याची माहिती महानगर आयुक्त यांनी दिली व यास मान्यता मिळावी असे सांगितले.

७.३ कार्यकारी समितीच्या सदस्यांनी या विषयावर चर्चा करून सदरची वाढ ही प्रकल्प सल्लागाराच्या अंदाजपत्रकामध्ये काही त्रुटी राहील्यामुळे झालेली आहे असे निदर्शनास आणले. तसेच प्रकल्प सल्लागाराकडून याबाबतचा खुलासा मागवून कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत सादर करण्याचे सुचविले. तसेच संबंधित प्रकल्प सल्लागारांना कार्यकारी समितीच्या आगामी बैठकीत बोलविण्यात यावे.

७.४ सदस्यांनी असेही सुचविले की, मुख्य अभियंता यांनी सदर कार्यक्षेत्राची पाहणी करून कामाच्या सद्यस्थितीचे पुढील कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये सादरीकरण करावे.

याबाबतचा निर्णय कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत घेण्यात येईल असे बैठकीत ठरले.

**बाब क्र.८ : मेट्रो मार्गाच्या प्रकल्पाची त्वरीत अंमलबजावणी करण्याकरीता संचालक (प्रकल्प) मेट्रो या पदावरील नेमणूकीबाबत.**

८.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता निर्माण करण्यात आलेल्या उपरोक्त पदांपैकी 'संचालक (प्रकल्प) मेट्रो' 'संचालक (नियोजन) मेट्रो' व 'मुख्य अभियंता (स्थापत्य) मेट्रो' ही पदे त्वरीत भरणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यकारी समितीच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या २४६व्या बैठकीवरील ठराव क्र.१२९२ अन्वये सदर पदांच्या सेवाप्रवेश नियमांस तसेच सदर पदे भरण्याच्या दृष्टीने विभागीय पदोन्नती समिती/निवड समिती गठीत करण्यास मंजूरी देण्यात आली. तसेच सदर पदे भरण्याकरीता महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे. 'संचालक (प्रकल्प) मेट्रो' या पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार सदर पद पदोन्नतीने किंवा सरळसेवेने किंवा प्रतिनियुक्तीने भरण्याची तरतूद आहे. त्यानुसार पदोन्नतीची प्रस्ताव विभागीय समितीपुढे सादर करण्यात आला. पदोन्नती समितीच्या दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीनुसार विभागीय पदोन्नती समितीने श्री.पी.आर.के.मूर्ती, प्रमुख परिवहन व दळणवळण विभाग यांची शैक्षणिक अर्हता, मागील २५ वर्षाचा अनुभव तसेच मेट्रो प्रकल्पावरील १० वर्षाचा अनुभव विचारात घेऊन त्यांची पी.बी.IV रु.३७,४००-६७,००० + ग्रेड पे रु.१०,०००/- या वेतनश्रेणीतील 'संचालक (प्रकल्प) मेट्रो' या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यास शिफारस केली. कार्यकारी समितीने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन तसेच समितीने सादर केलेल्या अहवालास अनुसरुन महानगर आयुक्त यांनी दिलेल्या मान्यतेनुसार दिनांक ११ डिसेंबर, २०१५ पासून श्री.पी.आर.के.मूर्ती, प्रमुख परिवहन व दळणवळण विभाग यांना 'संचालक (प्रकल्प) मेट्रो' या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यात आलेली आहे.

८.२ 'संचालक (प्रकल्प) मेट्रो' हे पद पदोन्नतीने भरण्याकरीता केलेली कार्यवाही कार्यकारी समितीच्या माहितीकरीता सादर करण्यात आल्याचे महानगर आयुक्त यांनी नमूद केले.

**निर्णय : कार्यकारी समितीने सदर नियुक्तीची नोंद घेतली.**

**बाब क्र. ९ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ ते ३१ डिसेंबर, २०१५**

दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ हया कालावधीत प्राधिकरणाने शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार विविध बँका/वित्तीय संस्था यामध्ये केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय : सदरहू गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र.१० : प्राधिकरणाचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**निर्णय : प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

----------xox----------